MHLA020055992022

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१७९०/२०२२**
**अर्चना व इतर वि. निरंक**

## निशाणी क्रमांक १ खालील आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज, अर्जदार यांनी मयत दिपक किशन कांबळे यांचे वारस म्हणून घोषित करून मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) अर्जदार यांचे कथन असे आहे की, दिपक किशन कांबळे यांचा मृत्यू दिनांक ०२/०५/२०२१ रोजी झाला असून त्यांच्या पश्चात अर्जदार क्र. १ अर्चना दिपक कांबळे (पत्नी), अर्जदार क्र. २ माधवी दिपक कांबळे (मुलगी), अर्जदार क्र. ३ दिव्या दिपक कांबळे (मुलगी), अर्जदार क्र. ४ विद्या दिपक कांबळे (मुलगी) व इतर वारस सोजर किशन कांबळे (आई) हे वारस आहेत. मयताचे वारस या नात्याने शासकीय व निमशासकीय कामासाठी अर्जदारांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे ते मयत दिपक किशन कांबळे यांचे वारस आहेत असे घोषित करून मिळावे अशी विनंती केली आहे.

३) अर्जाच्या अनुषंगाने अर्जास आक्षेप असल्यास दाखल करण्यासाठी दैनिक 'विश्वउदय' या वर्तमानपत्रात जाहीर प्रगटन देण्यात आले. जाहीर प्रगटन देवूनही अर्जास कोणी आक्षेप नोंदविला नाही.

४) अर्जाच्या पुष्टयर्थ अर्जदार क्र. १ यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.१६ वर सादर केले आहे. तोंडी पुराव्याखेरीज कागदपत्र यादी (नि.४ व १० खाली) मयताचे मृत्यूप्रमाणपत्र, अर्जदारांचे आधारकार्ड ई. च्या छायांकित प्रती आणि दैनिक 'विश्वउदय' या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द केलेल्या जाहीरप्रगटनाची प्रत ई. दाखल केले आहे.

५) अर्जदारांचा तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दिपक किशन कांबळे यांचा मृत्यू दिनांक ०२/०५/२०२१ रोजी झालेला आहे. प्रस्तुत प्रकरणात इतर वारसांनी देखील नि.क्र. १४ वर म्हणणे दाखल करुन सदर प्रकरणी ईतर वारस यांची काही एक हरकत नाही व तसेच त्यांना ईतर काही एक म्हणणे सादर करायचे नाही असे कथन केले आहे. जाहीर प्रगटन देवून देखील इतर कोणीही मयताचे वारस असल्याबाबत आक्षेप नोंदविला नाही. प्रकरणातील पुराव्यावरून मयत दिपक किशन कांबळे यांच्या पश्चात अर्जदार व इतर वारस हेच कायदेशीर वारस आहेत असे दिसून येते. त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणीही वारस असल्याबाबत कोणताही पुरावा सदर प्रकरणात दाखल नाही. अशा परिस्थितीत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. या ठिकाणी महत्त्वाची नमूद करावयाची बाब म्हणजे अर्जदार यांनी मयताचे वारस या नात्याने शासकीय व निमशासकीय कामासाठी अर्जदारांनी वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. अनेकदा शासकीय योजनांसाठी वारस

प्रमाणपत्राची मागणी करुन त्याचा मयत व्यक्तीचे नावावरील रक्कम काढून घेण्यासाठी गैरवापर केला जातो. सदरची बाब टाळण्यासाठी अर्जदाराने नमूद केलेल्या कारणासाठीच वारस प्रमाणपत्र देत असल्याचे वारस प्रमाणपत्रात नमूद करणे नैसर्गिक न्यायाचे ठरणार आहे. त्यानुसार सदरील प्रमाणपत्र अर्जदार व इतर वारस हे मयत दिपक किशन कांबळे यांचे वारस असल्याबाबत देण्यात येत आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) अर्जदार क्र. १ अर्चना दिपक कांबळे (पत्नी), अर्जदार क्र. २ माधवी दिपक कांबळे (मुलगी), अर्जदार क्र. ३ दिव्या दिपक कांबळे (मुलगी), अर्जदार क्र. ४ विद्या दिपक कांबळे (मुलगी) व इतर वारस सोजर किशन कांबळे (आई) हे मयत **दिपक किशन कांबळे** यांचे कायदेशीर वारस असल्याने त्यांच्या नावे मुंबई रेग्युलेशन VIII, १८२७ मधील जोडपत्र–ब नुसार केवळ मयताचे वारस या नात्याने शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) द्यावे.

३) अर्जदार यांनी बंधपत्र सादर करावे.

४) येणेप्रमाणे सदर अर्ज निकाली काढण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
KUNDAN MADHUKAR
KAYANGUDE
Date: 2023.02.22
16:49:22 +0530

दिनांकः– २२/०२/२०२३.

ठिकाणः– लातूर.

(के.एम.कायंगुडे)
२रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
लातूर.

...